**वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली - शिक्षण क्षेत्रातील एक गौरवशाली तीर्थक्षेत्र**

भारतीय चित्रपट सृष्टीला गौरव प्राप्त करुन देणाऱ्या प्रभात ह्या आद्य चित्रपट संस्थेने अनेक नामांकित चित्रपटांची देणगी मराठी मातेला दिली. आजही उल्लेख केला जातो की, प्रभात ही संस्था नव्हती तर एक मोठे कुटुंब होते ज्यांनी कधीही आर्थिक लाभाचा विचार केला नाही तर केवळ नैतिकता व सामाजिक तत्वांची मूल्ये जोपासली.

पांडवांनी जसे समजून उमजून तत्वासाठी वनवास स्वीकारला तसेच असिधाराव्रत प्रभातने आचरले. परंतु शेवटी आर्थिक दुर्बलतेपायी अस्तित्वच विलीन करावे लागले पण आदर्श असे केवळ नांव मात्र उरले. कुटुंब पांगले तरी त्यांच्यातील सामाजिक जाणीव धगधगत होती, लक्ष्मी मातेने पाठ फिरविली तरी सरस्वती मातेचा आशिर्वाद, मूल्ये व चारित्र्य सोबत होते. प्रभात मधील अभियांत्रिकी परिवार स्वस्थ बसू शकत नव्हता. हलाखीच्या अवस्थेत सुध्दा त्यांनी एकत्र येऊन विधायक कार्य उभे करण्याचा संकल्प केला. त्या दैवी मंथनातून सांगली येथे "न्यू इंजिनिअरिंग कॉलेज " ची मुहुर्तमेढ १९४९ साली रोवली गेली.

आजच्या काळांत कॉलेज सुरु करणे हा राजकीय लोकांचा आर्थिक लाभाचा धंदा झालेला आहे. शिक्षण सामान्य जनतेच्या आर्थिक क्षमते बाहेर गेलेले आहे. शिक्षक हा कारखान्यातील मजूराप्रमाणे पगावाढीसाठी संप करु लागला आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यापेक्षा आपल्या आर्थिक उज्वल भवितव्याचीच जाणीव उरली आहे, मग त्यासाठी खाजगी क्लासेस, पेपर फोडणे इत्यादी अनैतिक मार्गांचा विधिनिषेध राहिला नाही. त्या पार्श्वभूमीवर वरील कॉलेज सुरू करणारे व त्यांचा उदात्त हेतु, सामीजीक जाणीव प्रभावी पणे जाणवते.

पोटभरु उद्योग म्हणून त्यांनी शिक्षकी क्षेत्र निवडलेच नव्हते. भारताच्या तरुण पिढीचे भाग्य उदयास आले व वैदिक संस्कृतीला भूषणावह गुरुजनांची सावली व ज्ञान - मार्गदर्शनाचे दालन खुले झाले असेच म्हणावे लागेल.

पण येथेसुध्दा संस्था चालविणे म्हणजे आर्थिक गरज स्वतःसाठी नाही, तरी शिक्षणासाठी योग्य व आवश्यक साधन सामग्री उभी करण्यासाठी अनिवार्य होती. गरज व उपलब्धि यातील दरी जोडणे दिवसेंदिवस अवघड होत होते.

संकटे आली तरी लाचारी, याचना, दीनता ह्या शिक्षणाचार्यांच्या रक्तांतच नव्हती. घरादारावर निखारा ठेवावा लागला तरी व्रत चालवणे त्यांनी सोडले नाही.

शेवटी परमेश्वरालापण करुणेचा सागर आवरतां आला नाही आणि श्रीमान् शेठ लालचंद हिराचंद ह्यांनी उदारपणे कै. श्रीमान् शेठ लालचंदजींचे नांवे घसघशीत देणगी दिली. शिक्षक परिवाराने, अट नसतांना सुध्दा कृतज्ञता म्हणून कॉलेजचे नांव बदलण्याचा निर्णय घेतला व आज जगभर प्रसिध्द असलेले वालचंद कॉलेज नवीन रुपांत साकारले.

शिक्षण घेऊन तयार झालेल्या अनेक विद्यार्थांनी सुध्दा बाहेरील प्रलोभने लाथाडून ह्या व्रतांत सामील होण्याचा पायंडा घातला. .......( नांवे शोधून देणे)....... शिक्षकांची मुले सुध्दा ह्यापासून दूर राहिली नाहीत -उदा. कै. तिलवल्ली सरांचे चिरंजीव इ.

असे म्हटले अतिशयोक्ती होणार नाही की, शिक्षकांनी आदर्श तत्वे अंगिकारीली असे नसून आदर्श तत्वासाठी सगुणरुप म्हणून त्यांची नांवे घेणे जास्त सयुक्तिक होईल व जगांने त्यांचे अनुकरण करावे ही त्यांची योग्यता होती.

विस्तारभयाने सर्व नांवे घेणे शक्य नसले तरी कांही अनिवार्य ठरतांत - उदा. कै. श्री. बर्वे सर व सौ. काकू. त्यांचे विद्यार्थ्यांच्या आठवणींचे एक पुस्तकच छापणे योग्य होईल तरी अपुरे ठरेल. मी स्वतः ७४ च्या जाने महिन्यांत एकाच वेळी टॉयफाइड व कावीळ अशा विचित्र आजाराने ग्रस्त होतो. बरे वाटू लागल्यावर डॉक्टरांनी मेसचे जेवण चालणार नाही व पथ्याचे जेवण घेतले पाहिजे असे सांगितले. सुमारे ८ - १० दिवस दोन्ही वेळेस आदरणीय सौ. काकू घरुन ताट पाठवित असत. रोज सायंकाळी ( सर्व्हेइंगची बॅच सकाळी पांच वाजतां घेऊन गेलेले सर सांयकाळी ५ वा. परतल्यावर चहासुध्दा न घेतां फ्रेश होऊन) सर व सौ. काकू रुमवर माझेजवळ किमान अर्धातास तरी बसत. सौ. काकूंचा तो केसांमधून फिरणारा मायेचा हात आयुष्यभर विसरणे शक्य नाही. एक दिवस दुपारी त्यांनी विठ्ठल बरोबर चिठ्ठी पाठविलेली "रात्री जेवणांत काय पाठवू?" आजही ती चिठ्ठी मी लॅमिनेट करुन अमोल ठेवा म्हणून जपून ठेवलेली आहे. कै. श्री. तिलवल्लीसर व सौ. काकूसुध्दा ह्याला अपवाद नव्हते. कोणी ताट पाठवावे म्हणून सौ. बर्वेकाकू व सौ. तिलवल्ली काकूंचे वाद होत असत - मुद्दा काय तर - तुमचा मुलगा तसा आमचा पण मुलगा नाही काय ? जगाच्या पाठीवर असा प्रसंग नक्कीच कधीही - कोठेही घडला नसणार कारण अशी देवतुल्य, मातृपितृतुल्य गुरुजन व गुरुमाता व्यक्तीच नसणार.

स्वतः प्राचार्य कानिटकर सर हे प्रभात मधे साऊंड इंजिनिअर होते, तर वर्कशॉप मधील कामगार मुजावर उत्कृष्ट ढोलकी वादक होते. वालचंदचा परिवार असा विविध गुणांनी नटलेला सजलेला होता. सर्व प्रकारचे उच्चतम कौशल्य विद्यार्थ्यावर आत्मीयतेने ज्ञानाचा वर्षाव करीत असे.

१२०० पेक्षाही अधिक मुले राहात असलेल्या १२ इमारतीत विभागलेल्या होस्टेल्सची संपूर्ण व्यवस्था केवळ एकटे बर्वसर व त्यांचा एकमेव शिपाई विठ्ठल सांभाळत असत. सकाळी आलेले टपाल त्याच दिवशी आम्ही ११३० वा. जेवणाच्या सुटीत रुम जातअसे तेव्हां आमच्या दारांत टाकलेले असे. बर्वसरांची शिस्त अलौकिक होती. स्वतःला सुध्दा त्यांनी अपवाद केले नाही. विद्यार्थ्याने सही बरोबर तारीख टाकलीच पाहिजे असा त्यांचा दंडक होता, जर चूक झाली तर मेसच्या बिलांत त्याबद्दल ५० पैसे दंड भरावा लागत असे. एकदा एका मेसच्या नोटीसवर सरांनी सही केली होती पण तारीख टाकणे अनवधानाने राहून गेले होते. एका विद्यार्थ्याने हे निदर्शनांस आणून देतांच त्यांनी सर्व १० मेसच्या बिलांत स्वतःचा दंड म्हणून प्रत्येकी एक एक रुपया जमा केला होता. अभिमानाची बाब होती की, होस्टेलमधील एक सुध्दा विद्यार्थी बाहेर जेवत नसे. मेस मधे काम करणारी प्रत्येक व्यक्ती विद्यार्थ्याची काळजी घेत असे. मी लॅब किंवा लायब्ररी मधे व्यग्र असण्याने रात्री ११ वा. गेलो तरी मला पोळ्या गरम करुन वाढणारा सदा (पूर्ण नांव आठवत नाही), मी आजारी असतांना मला बाथरूम पर्यंत गरम पाणी आणून देणारा काश्या (जो मोची असला तरी कॉलेजच्या परिवारांतीलच होता) कधीच विसरणे शक्य नाही.

मी श्री. रवींद्र मराठे यांचे कडील नोकरीचा राजिनामा देऊन सांगली सोडली तेव्हां श्री. तिलवल्लीसर सेवानिवृत्त झाले होते. त्यांनी मला घरी जेवावयांस बोलाविले होते व अनेक वर्षानंतर पोळपाट लाटणे हांतांत घेऊन माझ्यासाठी पुरणपोळ्या स्वतः बनविल्या होत्या व पितृवात्सल्याने मला पानांत वाढत होते. ही संस्कृतीच वालचंद कॉलेजचे वैभव होती.

शिक्षक असोत, इतर स्टाफ असोत किंवा ऑफिस स्टाफ असोत प्रत्येकाचे प्रेम अवर्णनीय होते. त्याची महत्ता ज्याने अनुभवली त्यालाच कळू शकली.

दाता कसा असावा ह्याचे श्रीमान् लालचंदशेठ हे आदर्श होते. रौप्यमहोत्सवी वर्षी मी कॉलेजचा G.S. व माडेल्स-एक्झिबिशनचा सेक्रेटरी होतो. एका भेटीत शेठजी कॉलेजच्या विविध विभागांत फिरुन अवलोकन करीत होते

व मी सोबत होतो. मेकॅनिकल विभागांत गेल्यावर श्री. निगळेसर बरोबर होते त्यांना विचारले की, काय कमतरता आहे. सर थोडेसे संकोच करीत होते, मला माहित असल्यामुळे मी सांगितले की, शेठजी येथील इंजिने अत्यंत जुनी असल्याने त्यावर केलेले प्रॅक्टिकल्स तसे निरुपयोगी असतांत जर नवीन इंजिन मिळाले तर विद्यार्थ्यांना चांगले प्रयोग करतां येतील. शेठजींनी विचारले की,जर नवीन इंजिन मिळाले तर उपकरण कार्यान्वित करण्यां किती दिवस लागतील, आणि त्या दिवशी ते सुरु झालेले नसेल सदर इंजिन परत नेले जाईल. श्री. निगळे सरांनी एक महिन्याचा कालावधी मागितला. शेठजींनी दीड महिन्याची मुदत देऊ केली व सांगितले की ते त्यानुसार प्रगति पाहण्यांस येतील व तेथेच सोबत असलेल्या सेक्रेटरीला ४ दिवसांचे आंत इंजिन कॉलेजला मिळेल ह्याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार तातडीने कॉलेजला प्रिमिअर फियाटचे कोरेकरकरीत पेट्रोल इंजिन मिळाले. ठरल्यानुसार दीड महिन्यानंतर श्रीमान् शेठजी कॉलेजमधे आदल्या दिवशी आलेले होते. मी त्यांना भेटण्यांस गेलो असतां त्यांनी उद्या केव्हां येऊ असे विचारले त्यावेळी मी उत्तर दिले की, आपण आतां आलांत तरी सर्व दाखविण्याची तयारी आहे, कारण त्याआधीच १७ दिवसापूर्वीच श्री. निगळे सरांनी संपूर्ण सेटअप तयार करुन विद्यार्थ्यांना प्रयोगासाठी उपलब्ध झाले होते व विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयोगांचे रिपोर्टसुध्दा तयार होते. श्रीमान् शेठजी तात्काळ मेकॅनिकल डिपार्टमेंट मधे आले. त्यांनी सर्व काळजीपूर्वक समजून घेतले व अत्यंत प्रसन्न होऊन सरांना विचारले की, तुम्हांस आणखी काय हवे ? आधीच ठरल्यानुसार पेट्रोल इंजिन मिळाले तसेच नवीन डिझेल इंजिन मिळाले तर विद्यार्थ्यांना लाभ मिळेल असे म्हणतांच त्यांनी आनंदाने बेडफोर्डचे कोरेकरकरीत - पेटी पॅक डिझेल इंजिन कॉलेजला एक आठवड्यांत पाठवून दिले. असे दाता व विद्यार्थ्यांबद्दल अशी कळकळ असलेले निगळसर (जे टाटा आटोमोटिव्ह मधील उच्च पगाराची नोकरी सोडून केवळ ज्ञान दानाच्या उदात्त हेतुने वालचंद कॉलेजला आलेले होते.).

माझ्या दोन वर्षाच्या कालावधीत अनेक लोकोत्तर बाबी निदर्शनास आल्या हे माझे भाग्य. प्रत्येक विद्यार्थ्याचे अनुभव असणारच म्हणून मी माझे निवेदन आवरते घेतो.

७४ सालचे कॉलेजचा बेस्ट स्टुडंटचा सर्वोच्च सन्मानाचा पुरस्कार व इतर अनेक पुरस्कार त्या वर्षी मला मिळाले होते. रोख रक्कमच सुमारे दोन हजारापेक्षा जास्त होती. (त्यांत श्रीमंत रामसाहेब वेलणकर, श्री. पंडिराव कुलकर्णी इ.नी दिलेले सुध्दा होते.). त्या रोख रकमेतून आपल्या गणपती मंदिरांत सत्यनाराण पूजन करण्याचा मानस व्यक्त करतांच सर्वांनी त्याला प्रोत्साहन दिले. श्री. बर्वेसरांच्या सूचनेनुसार जॉली मेसच्या आचारी श्री. दशरथ यांनी २५ किलोचा प्रसाद शुध्द तुपांत तयार केला होता. व नैवेद्यासाठी सौ. बर्वेकाकू यांनी सव्वाशेराचा प्रसाद स्वतः घरी तयार सोवळ्यांत तयार करुन अनवाणी मंदिरांत घेऊन आल्या होत्या. प्रि. श्री कानिटकर सर व सौ. कानिटकर काकू यांचे हस्ते पूजन केले होते. प्रसादासाठी तत्कालीन कलेक्टर श्री. लखनपाल, पोलिस कमिशनर श्री. व्यंकटाचलम् आणि सांगली, मिरज, माधवनगर येथील सर्व नामवंत उद्योगपति, प्रतिष्ठित व्यक्ति आवर्जून आलेल्या होत्या. कॉलेज सुरु झाल्या पासूनचा त्या प्रांगणातील तो पहिलाच श्री. सत्यनारायण पूजनाचा प्रसंग होता. तो ही एका विद्यार्थ्याने स्वतःस मिळालेल्या पुरस्काराच्या विनियोगातून केलेला.!!!

**"सोडा लेमन - जिंजर लॉलीपॉप - वालचंद कॉलेज वालचंद कॉलेज ऑलवेज ऑन दि टॉप"**

डॉ. ॐप्रकाश ग. कुलकर्णी
(एक माजी विद्यार्थी)